N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
## (Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** उस्मानाबाद
**P.S.(ठाणे):** आनंदनगर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0373
**Year (वर्ष):** 2023
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 28/09/2023 22:52

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** गुरूवार
**Date From (दिनांक पासून):** 28/09/2023
**Time Period (कालावधी):** पहर 4
**Date To ( दिनांक पर्यंत):** 28/09/2023
**Time From (वेळेपासून):** 11:55 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 12:22 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 28/09/2023 **Time (वेळ):** 22:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 032
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 28/09/2023 22:29 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** पंचायत समिती, धाराशिव चे आवारातील ,हॉटेलमध्ये

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** लक्ष्मीकांत दत्तात्रय सुर्यवंशी

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1993

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रा ढोकी ,ता जि धाराशिव,आनंदनगर,उस्मानाबाद,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रा ढोकी ,ता जि धाराशिव,आनंदनगर,उस्मानाबाद,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9637737070

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | मिलींद सुर्यकांत कांबळे | | | 1. राविक्रम नगर, बोधी चौक,... ,आनंदनगर,उस्मानाबाद, महाराष्ट्र,भारत |
| 2 | हनुमंत गोपाळराव पवार | | | 1. काकडे प्लट, दत्त नगर, धाराशिव,धाराशिव,आनंदनगर, उस्मानाबाद,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs.) (मुल्य (रू.) |
|---|---|---|---|---|



Scanned with CamScanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500रुपये दराच्या 8चलनी नोटा | 4,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

4,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

मी लक्ष्मीकांत दत्तात्रय सुर्यवंशी, वय 30 वर्षे व्यवसाय- सलुन दुकान, मुळ रा. ढोकी ता.जि. धाराशिव सध्याचा पत्ता- शिंगोली ता.जि. धाराशिव मोबाईल नंबर 9637737070, 9309146353.

आज दिनांक 28.09.2023 रोजी समक्ष लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद येथे हजर राहुन फिर्याद देतो की, मी वरील गावचा राहणारा असुन समता नगर, धाराशिव येथे माझे सलुनचे दुकान असून त्याचा मी व्यवसाय करित आहे.

दिनांक 26.09.2023 रोजी मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद येथे हजर राहुन पोलीस उप अधीक्षक श्री.म्हेत्रे साहेब यांचेकडे तक्रार दिली, त्यातील हकीकत अशी की, " माझी आई कालींदा निवृत्ती मोरे ही जि.प. प्रशाला शाळा, पाडोळी (आ) ता. जि. धाराशिव येथून दिनांक 31.07.2023 रोजी शिपाई (परिचर) या पदावरुन सेवानिवृत्त झालेली आहे. तिला सेवानिवृत्तीनंतर शासनाकडून मिळणारे अंशराशीकरण व उपदानाची एकुण रक्कम रूपये 15,29,804/- मिळणे बाकी आहे. त्याकरिता आम्ही आईचे संपुर्ण कागदपत्राची पुर्तता केली आहे. परंतू अदयाप पर्यंत शासनाकडून सदरची रक्कम आईच्या बँक खात्यावर जमा झाली नाही. त्यामुळे मी पंचायत समिती, धाराशिव येथे जावून चौकशी केली असता सदरचे काम पंचायत समिती, धाराशिव येथे लेखा विभागातील लिपीक मिलींद कांबळे यांचेकडे प्रलंबीत असल्याचे मला समजले.

आज दिनांक 26.09.2023 रोजी मी पंचायत समिती, धाराशिव येथे जावून लिपीक मिलींद कांबळे यांची भेट घेवून त्यांना माझी आई कालींदा निवृत्ती मोरे हिला शासनाकडून सेवानिवृत्तीनंतर मिळणारे अंशराशीकरण व उपदानाची रक्कम अदयाप पर्यंत तिच्या बँक खात्यावर कशामुळे जमा झालेली नाही अशी विचारना केली असता त्यांनी मला तुम्ही पैसे दिल्याशिवाय तुझ्या आईच्या बँक खात्यावर पैसे जमा होणार नाही असे सांगितले. तेव्हा मी त्यांना किती पैसे दयावे लागतील असे म्हणुन विचारले असता त्यांनी मला 4,000/- रूपये दयावे लागतील असे म्हणून त्यांनी माझ्याकडे 4,000/- रूपयाची मागणी केली. त्यावेळी तेथे रिटायर कर्मचारी हनुमंत पवार हे हजर होते व त्यांनी पण मला कांबळे साहेबांना काहीतरी देवुन टाक असे म्हणाले. तेव्हा माझ्या लक्षात आले की, मिलींद कांबळे हे माझ्याकडे लाचेची मागणी करीत आहेत. त्यावेळी मी त्यांना सध्या माझ्याकडे तेवढे पैसे नाहीत काहीतरी ॲडजेस्ट करतो असे म्हणुन त्यांच्यापासुन निघुन आलो.

मिलींद कांबळे, लिपीक यांनी माझ्याकडे मागणी केलेली 4,000/- रुपये ही कोणतीही शासकीय फिस नसुन ती लाचच असल्याची माझी खात्री झाली आहे. मला त्यांना लाच देण्याची इच्छा नाही" वगैरे मजकुरची तक्रार दिली. त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी कार्यकारी अभियंता, महावितरण विभागीय कार्यालय, धाराशिव यांना पत्र देवुन दोन शासकीय पंच 1) बालाजी सिताराम आगवाने, पद- मुख्य तंत्रज्ञ, भ.नि.नि.क्र.2014483, महाराष्ट्र राज्य, विद्युत वितरण कंपनी मर्यादीत, धाराशिव, 2) शिवाजी मोहन साळुंके, पद- निम्नस्तर लिपीक, महाराष्ट्र राज्य, विद्युत वितरण कंपनी मर्यादीत, धाराशिव हे उपलब्ध करुन घेतले. त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी स्वत:चा तसेच पंचाचा, माझा व कार्यालयातील पोलीस अंमलदार यांचा आपसी परिचय करुन दिला. त्यानंतर त्यांनी पंच क्रमांक 1 म्हणुन बालाजी सिताराम आगवाने तर पंच क्रमांक 2 म्हणुन शिवाजी मोहन साळुंके यांची निवड केली. त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी मला माझी तोंडी तक्रार सांगण्यास सांगितली असता मी माझी तोंडी तक्रार दोन्ही पंचासमक्ष सांगितली. त्यानंतर मी म्हेत्रे साहेब यांचेकडे माझे हस्ताक्षरात दिलेली तक्रार त्यांनी दोन्ही पंचांना वाचण्यास दिली. सदरची तक्रार दोन्ही पंचांनी वाचुन पाहिली. मी सांगितलेली तोंडी व माझे हास्तक्षारात दिलेली तक्रार एकच असल्याची खात्री झाल्यानंतर दोन्ही पंचांनी त्यावर सहया केल्या. त्यानंतर मी दिलेली तक्रार म्हेत्रे साहेब यांनी स्वत:कडे ठेवुन घेतली.



Scanned with CamScanner

त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी मला दोन्ही पंचासमक्ष सांगितले की, माझे आईचे बँक खात्यावर तिला सेवानिवृत्तीनंतर शासनाकडून मिळणारी अंशराशीकरण व उपदानाची रक्कम जमा करण्यासाठी माझ्याकडे लोकसेवक मिलींद कांबळे हे लाचेची मागणी करतात किंवा कसे ? याबाबत आज दिनांक 26.09.2023 रोजी त्यांची पंचासमक्ष लाचमागणी पडताळणी करण्यात येणार आहे.

त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी दिलेल्या सुचनेवरुन पोना/बेळे यांनी एका काळया रंगाच्या बॅग मधुन Sony कंपनीचे डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर बाहेर काढुन मला व दोन्ही पंचांना व्हॉईस रेकॉर्डर बाबत सविस्तर माहिती देवुन त्याचे प्रात्यक्षिक करुन दाखविले. त्यानंतर पोना/बेळे यांनी त्यामध्ये एक 32 GB चे नवीन SanDisk कंपनीचे Micro SD HC I असे वर्णनाचे नमूद असलेले मेमरी कार्ड टाकले. त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी कळविले की, लाचमागणी पडताळणी दरम्यान माझ्यात व लोकसेवक मिलींद कांबळे यांचेत होणारे मुळ संभाषण हे व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरीकार्डमध्ये रेकॉर्ड होणार आहे. त्यानंतर पोना/बेळे यांनी सदर व्हाईस रेकॉर्डर चालु करून त्यामध्ये पुर्वीचे कोणतेही संभाषण ध्वनी मुद्रीत झाले नसलेबाबत मला व दोन्ही पंचाना खात्री करून दिली.

त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी सुचना दिली की, मी पंच क्रमांक 1. बालाजी आगवाने यांचेसह पंचायत समिती, धाराशिव येथे जावुन लोकसेवक मिलींद कांबळे यांची भेट घेवुन त्यांना माझे आईचे बँक खात्यावर सेवानिवृत्तीनंतर शासनाकडून मिळणारी अंशराशीकरण व उपदानाची रक्कम जमा करणेबाबत बोलावे. दरम्यान त्यांनी लाचेची मागणी केल्यास त्यांचेकडुन वेळ मागुन घेवुन सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत यावे असे सांगितले. तसेच पंच क्रमांक 1 बालाजी आगवाने यांना देखील सुचना दिल्या.

त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी दिलेल्या सुचनेवरून पोना/बेळे यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझे शर्टचे आतमध्ये असलेल्या बनियनला डाव्या बाजुस पिनने लावुन देऊन मला पंच क्रमांक 1 बालाजी आगवाने यांचेसह पंचायत समिती, धाराशिव येथे मिलींद कांबळे यांची भेट घेण्यासाठी माझ्याकडील कार क्र. MH-25/R-6942 ने 17.17 वा. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद येथुन पंचायत समिती, धाराशिवकडे रवाना केले. तेथे कार बाजुला लावुन मी व पंच क्रमांक 1 पायी चालत पंचायत समिती, धाराशिव येथील लेखा विभागाचे रूममध्ये गेलो. त्यावेळी तेथे मिलींद कांबळे, लिपीक हे न दिसल्याने काही वेळ आम्ही तेथेच थांबून राहीलो. त्यानंतर काही वेळाने मिलींद कांबळे तेथे येवुन त्यांचे खुर्चीवर बसले. त्यावेळी मी पंच क्रमांक 1 यांना हाताने इशारा करुन हेच ते मिलींद कांबळे, लिपीक असल्याचे सांगितले. त्यानंतर मिलींद कांबळे यांचेत व माझेत बोलणे झाले. त्यावेळी मिलींद कांबळे हे मला "बोला की.. असे म्हणाल्यावर मी त्यांना करा की तेवढं कांबळे साहेब.. असे म्हणालो. नंतर ते मला यांना आता केलो म्हणला मला.. असे म्हणाले. तेंव्हा मी त्यांना पैसे कोणापशी देवु..किती देवु? असे म्हणालो असता ते मला किती ठरलय तेवढं..असे म्हणुन त्यांनी उजव्या हाताची चार बोटे पुढे करुन ईशारा केला. त्यावर मी त्यांना चार देवू? असे म्हणालो असता ते मला हूं..असे म्हणाले. त्यादरम्यान तेथे असलेले हनुमंत पवार हे मला हं जा मग.. जा पटकन या.. असे म्हणाले. त्यानंतर मी मिलींद कांबळे यांना तिन देवु का चार देवु ? तुम्ही म्हणताल तेवढं देतो.. किती देवु सांगा..असे म्हणालो असता ते मला तुम्हाला देवु वाटतं तेवढं दया.. आत्ता काय बोलु आजुन.. असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना तुमच्या पेक्षा लय आहे का? तुम्ही काम फक्त आर्जंट करा.. असे म्हणालो असता त्यांनी मला आणलेत का? असे म्हणुन विचारले. तेंव्हा मी त्यांना ए.टी.एम.मधुन मला फक्त गाडी लावायची दुकानापुढे.. असे म्हणालो असता ते मला तुम्ही राहु दया उदया काम झाल्यावर दया..काही अडचण नाही.. तेच्यामुळं मी ठीवत बी नाही..तुम्ही गुपचुप जावा.. हया माणसावर भरोसा आहे की नाही तुमचा? असे म्हणुन पवार यांचेकडे हात केला. त्यानंतर मी त्यांना नाही नाही.. येतो मी माघारी येतो.. असे म्हणालो असता ते मला जावा घरी बसा जावा.. असे म्हणाले". त्यानंतर तेथुन मी व पंच क्रमांक 1 माझेकडील कारने 17.56 वा. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद येथे परत आलोत.

त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी पोना/बेळे यांना हाताने इशारा करुन माझ्याजवळील व्हॉईस रेकॉर्डर बंद करणेबाबत कळविल्याने पोना/बेळे यांनी माझे जवळील व्हाईस रेकॉर्डर काढुन बंद केला व मला बाजुच्या रुममध्ये जावुन थांबण्यास सांगितले. त्यावरुन मी बाजुचे रुममध्ये जाऊन थांबलो. त्यानंतर थोडया वेळाने म्हेत्रे साहेबांनी मला त्यांचे जवळ बोलावुन हकीगत विचारली असता, मी वरील प्रमाणे हकीकत पंचासमक्ष सांगितली. यावरून माझे आईस शासनाकडून सेवानिवृत्तीनंतर मिळणारे अंशराशीकरण व उपदानाची एकुण रक्कम 15,29,804/- रूपये तिचे बँक खात्यावर जमा करणेसाठी मिलींद कांबळे, लिपीक, पंचायत समिती, धाराशिव यांनी माझ्याकडे 4,000/- रुपये लाचेची मागणी केल्याचे व सदरची लाच रक्कम त्यांना देण्यासाठी रिटायर कर्मचारी हनुमंत पवार यांनी प्रोत्साहन दिल्याचे व मिलींद कांबळे यांनी सदरची लाच रक्कम उदया काम झाल्यावर दया असे म्हणाल्याचे निष्पन्न झाले. त्यावरून दिनांक 27.09.2023 रोजी मिलींद कांबळे, लिपीक, पंचायत समिती, धाराशिव व रिटायर कर्मचारी हनुमंत पवार यांचेविरुध्द सापळाचे आयोजन करण्याचे सर्वानुमते ठरले.

Scanned with CamScanner

त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे दिनांक 27.09.2023 रोजी मी सकाळी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद येथे हजर आलो. त्यावेळी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद येथे म्हेत्रे साहेब, पोलीस अंमलदार व दोन शासकीय पंच हजर होते. तेव्हा म्हेत्रे साहेब यांनी कळविले की, माझे आईस शासनाकडून सेवानिवृत्तीनंतर मिळणारे अंशराशीकरण व उपदानाची एकुण रक्कम 15,29,804/- रुपये तिचे बँक खात्यावर जमा करणेसाठी मिलींद कांबळे, लिपीक, पंचायत समिती, धाराशिव यांनी माझ्याकडे 4,000/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांचेविरुध्द आज दिनांक 27.09.2023 रोजी सापळ्याचे आयोजन करण्यात येणार आहे.

त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी आम्हास सापळा कारवाईचे अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर त्यांचे सुचनेवरुन मी माझ्याजवळील सर्व रोख रक्कम व चिजवस्तु त्यांचेसमोर टेबलावर काढुन ठेवल्या. त्यानंतर मी काढुन ठेवलेल्या चिजवस्तु व्यतिरिक्त इतर काहीही माझेकडे नसल्याची खात्री करुन मी हजर केलेल्या 500/- रुपये दराच्या 08 चलनी नोटा असे एकुण 4,000/- रुपयास अँथ्रासीन पावडर लावणे, अँथ्रासीन पावडरचे उपयोग, अल्ट्राव्हायलेट दिव्याचा उपयोग व गुणधर्म, त्याचे प्रात्यक्षिक दाखवुन तसेच लाचेच्या नोटांची अंधारात अल्ट्राव्हायोलेटच्या दिव्याखाली तपासणी वगैरे कार्यवाही केल्यानंतर पोहेकॉ/उगलमुगले यांनी सदर लाचेच्या नोटा माझे अंगावरील पॅन्टचे उजव्या बाजूचे खिशामध्ये ठेवुन दिल्या. त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी मला मिलींद कांबळे किंवा हनुमंत पवार यांनी माझेकडून लाच रक्कम स्विकारल्यानंतर डोळ्याला लावलेला चष्मा डाव्या हाताने काढुन खाली घेणेबाबत ईशारा मला नेमुण दिला.

त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी दिलेल्या सुचनेवरुन पोना/बेळे यांनी एका काळ्या रंगाच्या बॅग मधुन Sony कंपनीचे डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर बाहेर काढुन त्यामध्ये एक 32 GB चे नवीन SanDisk कंपनीचे Micro SD HC I असे वर्णनाचे नमूद असलेले मेमरी कार्ड टाकले. त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी कळविले की, सापळा कारवाई दरम्यान माझ्यात व लोकसेवक मिलींद कांबळे यांचेत होणारे मुळ संभाषण हे व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरीकार्डमध्ये रेकॉर्ड होणार आहे. त्यानंतर पोना/बेळे यांनी सदर व्हाईस रेकॉर्डर चालु करून त्यामध्ये पुर्वीचे कोणतेही संभाषण ध्वनी मुद्रीत झाले नसलेबाबत मला व दोन्ही पंचाना खात्री करून दिली. त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी दिलेल्या सुचनेवरून पोना/बेळे यांनी सदर व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन पिनने माझे शर्टचे आत बनियनला डाव्या बाजुस लावुन मला पंच क्रमांक 1 यांचेसह माझ्याकडील ज्युपिटर स्कुटर क्रमांक MH 25 AR 0630 ने 11.11 वाजता पंचायत समिती, धाराशिवकडे रवाना केले. आमचे पाठोपाठ सापळा पथक रवाना झाले. आम्ही पंचायत समिती, धाराशिव येथे गेल्यानंतर तेथे स्कुटरने बाजुला लावुन मी व पंच क्रमांक 1 पायी चालत पंचायत समिती, धाराशिव येथील लेखा विभागात मिलींद कांबळे यांचेकडे गेलो. त्यावेळी तेथे मिलींद कांबळे हे हजर नव्हते व हनुमंत पवार हे हजर होते. त्यावेळी हनुमंत पवार हे मला मिलींद कांबळे यांना फोन कर असे म्हणाले. नंतर हनुमंत पवार यांचेत व माझेत बोलणे झाले. त्या दरम्यान मी मिलींद कांबळे यांना फोन लावला, परंतू त्यांनी माझा फोन उचलला नाही. नंतर काही वेळाने मिलींद कांबळे तेथे येवुन त्यांचे खुर्चीवर बसले. तेव्हा मिलींद कांबळे यांनी मला "तुम्ही फोन केलता का आता.. असे म्हणुन विचारले असता मी त्यांना हं..असे म्हणालो. त्यानंतर मिलींद कांबळे हे मला पेमेन्ट सोडतो खात्यावर दिड - दोन वाजेपर्यंत.. मी फोन करतो .. पेमेन्ट सोडल्यावर असे म्हणाले". त्यानंतर तेथुन मी व पंच क्रमांक 1 माझेकडील स्कुटरने 11.41 वा. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद येथे परत आलोत व आमचे पाठोपाठ सापळा पथकही परत आले.

त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी पोना/बेळे यांना हाताने इशारा करुन माझ्याजवळील व्हॉईस रेकॉर्डर बंद करणेबाबत कळविल्याने पोना/बेळे यांनी माझे जवळील व्हाईस रेकॉर्डडर काढुन बंद केला व मला बाजुच्या रुममध्ये जावुन थांबण्यास सांगितले. त्यावरुन मी बाजुचे रुममध्ये जाऊन थांबलो. त्यानंतर थोडया वेळाने म्हेत्रे साहेबांनी मला त्यांचे जवळ बोलावुन हकीगत विचारली असता, मी वरील प्रमाणे हकीकत पंचासमक्ष सांगितली.

त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी माझ्याशी, सापळा पथक व पंच यांचेशी विचारविनीमय करुन आज रोजी पुन्हा मिलींद कांबळे, लिपीक यांचेविरुध्द सापळ्याचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगुन कार्यालयात थांबने बाबत सुचना दिल्या. त्यावरून मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद येथेच थांबुन राहीलो.

त्यानंतर बराच वेळ झाला तरी मिलींद कांबळे यांचा मला फोन न आल्याने पुन्हा म्हेत्रे साहेब यांनी माझ्याशी, सापळा पथक व पंच यांचेशी विचारविनीमय करुन आज रोजी पुन्हा सापळ्याचे आयोजन करण्याचे सर्वानुमते ठरले. त्यानंतर म्हेत्रे साहेब यांचे सुचनेवरुन पोना/बेळे यांनी व्हाईस रेकार्डमधील पुर्वीचे सिम कार्ड मध्येच माझेत व मिलींद कांबळे यांचेत होणारे संभाषण रेकार्ड होणार असलेबाबत सांगुन सदरचे व्हाईस रेकार्डर चालु करून पिनने माझे शर्टचे आत बनियनला डाव्याबाजुस लावुन मला पंच क्रमाक 1 यांचेसह माझ्याकडील ज्युपिटर स्कुटर क्रमांक MH 25 AR 0630 ने 12.55 वाजता पंचायत समिती, धाराशिवकडे रवाना केले. आमचे पाठोपाठ सापळा पथक रवाना



Scanned with CamScanner

झाले. आम्ही पंचायत समिती, धाराशिव येथे गेल्यानंतर तेथे स्कुटरने बाजुला लावुन मी व पंच क्रमांक 1 पायी
चालत पंचायत समिती, धाराशिव येथील लेखा विभागात मिलींद कांबळे यांचेकडे गेलो. त्यावेळी तेथे मिलींद कांबळे
हे त्यांचे खुर्चीवर बसलेले होते. तेव्हा त्यांचे समोर लोकांची गर्दी होती. नंतर काही वेळाने मिलींद कांबळे हे त्यांचे
खुर्चीवरुन उठून दुस-या रुम मध्ये जावु लागले असता मी त्यांचे जवळ गेलो. तेंव्हा मिलींद कांबळे हे मला "आरे होवु
दे की थांब गडबड का करायला.. असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना मला तिथं दुकानात थांबाचय.. असे म्हणालो
असता ते मला काम चालुय तुमच्या एकटयाचे बिल नाही.. पंचवीस बिलं आहेत.. आता निम्मे झालेत.. जावा
दुकानात जावा.. असे म्हणाले. त्यानंतर मी त्यांना माघारी येवु का असे म्हणुन विचारले असता ते मला जावा
दुकानात.. मी फोन करतो तुम्हाला.. " असे म्हणाले. त्यानंतर तेथुन मी व पंच क्रमांक 1 माझेकडील स्कुटरने
13.25 वा. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद येथे परत आलोत व आमचे पाठोपाठ सापळा पथकही परत
आले.

त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी पोना/बेळे यांना हाताने इशारा करुन माझ्याजवळील व्हॉईस रेकॉर्डर बंद करणेबाबत
कळविल्याने पोना/बेळे यांनी माझे जवळील व्हाईस रेकॉर्डर काढुन बंद केला व मला बाजुच्या रुममध्ये जावुन
थांबण्यास सांगितले. त्यावरुन मी बाजुचे रुममध्ये जाऊन थांबलो. त्यानंतर थोडया वेळाने म्हेत्रे साहेबांनी मला त्यांचे
जवळ बोलावुन हकीगत विचारली असता, मी वरील प्रमाणे हकीकत पंचासमक्ष सांगितली.

त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी माझ्याशी, सापळा पथक व पंच यांचेशी विचारविनीमय करुन दिनांक 27.09.2023
रोजीची सापळा कारवाई स्थगित करुन दिनांक 28.09.2023 रोजी पुन्हा मिलींद कांबळे यांचेविरुध्द सापळ्याचे
आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगुन सदर सापळा कारवाई बाबत गोपनियतता राखणेच्या सुचना दिल्या.
त्यानंतर म्हेत्रे साहेब यांचे सुचनेप्रमाणे माझ्याकडे देण्यात आलेली लाच रक्कम काढुन ती मी म्हेत्रे साहेब यांचेकडे
दिली. त्यांनी सदरची लाच रक्कम एका पांढ-या रंगाचे पॉकिटमध्ये ठेवुन सदरचे पॉकिट सिलबंद केले व त्यावर त्यांचे
आणि पंचाचे सहीचे चिठ्ठी लावुन ते त्यांचे ताब्यात घेतले.

त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे आज दिनांक 28.09.2023 रोजी मी सकाळी लाचलुचपत
प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद येथे हजर आलो. त्यावेळी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद येथे म्हेत्रे
साहेब, पोलीस अंमलदार व दोन शासकीय पंच हजर होते. त्यावेळी मी म्हेत्रे साहेब यांना काल रोजी रात्री उशीरा
माझ्या आईचे बँक खात्यावर अंशराशीकरण व उपदानाची एकुण रक्कम 15,29,804/- रूपये ही जमा झाल्याचे
सांगितले. त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी आज रोजी पुन्हा मिलींद कांबळे यांचेविरुध्द सापळयाचे आयोजन करण्यात
येणार असल्याचे सांगुन त्यांनी त्यांचेजवळ ठेवुन घेतलेले लाचेच्या नोटाचे सिलबंद पॉकिट माझे व पंचासमक्ष फोडुन
त्यामध्ये मी त्यांचेकडे हजर केलेलीच लाच रक्कम असल्याची व त्यास ॲंथ्रासीन पावडर असल्याची खात्री करुन
दिली. त्यानंतर त्यांचे सुचनेवरुन पोहेकॉ/उगलमुगले यांनी सदर लाचेच्या नोटाची घडी माझे अंगावरील पॅन्टचे
उजव्या बाजुचे खिशामध्ये ठेवुन दिली.

त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी दिलेल्या सुचनेवरुन पोना/बेळे यांनी एका काळ्या रंगाच्या बॅग मधुन Sony कंपनीचे
डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर बाहेर काढुन त्यामध्ये एक 32 GB चे नवीन SanDisk कंपनीचे Micro SD HC I
असे वर्णनाचे नमूद असलेले मेमरी कार्ड टाकले. त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी कळविले की, सापळा कारवाई दरम्यान
माझेत व लोकसेवक मिलींद कांबळे यांचेत होणारे मुळ संभाषण हे व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरीकार्डमध्ये रेकॉर्ड होणार
आहे. त्यानंतर पोना/बेळे यांनी सदर व्हाईस रेकॉर्डर चालु करून त्यामध्ये पुर्वीचे कोणतेही संभाषण ध्वनी मुद्रीत झाले
नसले बाबत मला व दोन्ही पंचाना खात्री करून दिली. त्यानंतर त्यांनी सदर व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन पिनने माझे
शर्टचे आत बनियनला डाव्याबाजुस लावुन मला पंच क्रमांक 1 यांचेसह माझ्याकडील ज्युपिटर स्कुटर क्रमांक MH
25 AR 0630 ने 11.55 वाजता पंचायत समिती, धाराशिवकडे रवाना केले. आमचे पाठोपाठ सापळा पथक
रवाना झाले. आम्ही पंचायत समिती, धाराशिव येथे गेल्यानंतर तेथे स्कुटर बाजुला लावुन मी व पंच क्रमांक 1 पायी
चालत पंचायत समिती, धाराशिव येथील लेखा विभागात मिलींद कांबळे यांचेकडे गेलो. तेव्हा लेखा विभागात मिलींद
कांबळे, वाघ साहेब व हनुमंत पवार हे वेगवेगळ्या खुर्च्यांवर बसलेले होते. त्यावेळी मी मिलींद कांबळे यांना "काय
चाललंय कांबळे साहेब.. असे म्हणुन विचारले असता ते मला काय नाही बाबा.. केल बग तुझं..असे म्हणाले त्यावर
मी त्यांना हा रात्री झाले जमा.. असे म्हणालो असता ते मला झाला का.. असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना हं.. असे
म्हणालो. त्यावेळी ते मला बस ये असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना म्हणुनच भेट घेयाला आलतो" असे म्हणालो व
त्यांचेत माझेत बोलणे झाले. त्यानंतर मी त्यांना चला चहा घेवू असे म्हणालो व आईचे रजा रोखीकरण आणि
जीपीएफ चा प्रस्ताव राहीले बाबत बोललो. नंतर तेथुन मी, पंच क्रमांक 1 मिलींद कांबळे, हनुमंत पवार व वाघ साहेब
असे चहा पिण्यासाठी पंचायत समिती, धाराशिव च्या आवारात असलेल्या एका हॉटेलमध्ये गेलो. तेथे पण त्यांचेत व



Scanned with CamScanner

माझेत आईचे बिला संदर्भाने बोलणे झाले. त्या दरम्यान हनुमंत पवार यांनी मला मिलींद कांबळे यांचे जवळ बसुन पैसे देणेबाबत हाताने ईशारा केल्याने मी मिलींद कांबळे यांचे बाजुला जावुन बसलो व माझ्या पॅन्टचे उजव्या बाजूच्या खिशातील लाच रक्कम उजव्या हाताने काढुन त्यांच्यापुढे धरली असता त्यांनी सदरची लाच रक्कम डाव्या हाताने स्विकारुन त्यांचे अंगावरील पॅन्टचे डाव्याबाजुच्या पाठीमागील खिशात ठेवुन दिली. त्यानंतर आम्ही चहा पिवुन पंचायत समिती, धाराशिव येथे लेखा विभागात परत गेलो. त्यावेळी मी मिलींद कांबळे यांना "येवु का सर.. असे म्हणालो असता ते मला हां काय अडचण नाही हो.. असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना चार हजार आहेत असे म्हणालो असता ते मला हो.. " असे म्हणाले. त्यानंतर मी पंचायत समिती, धाराशिव चे बाहेर येवुन मला नेमुन दिलेला ईशारा केला ती वेळ साधारण:त 12.22 वाजण्याची होती. त्यानंतर तेथे लागलीच म्हेत्रे साहेब, पंच क्रमांक 2 व सापळा पथक हजर आले. त्यानंतर म्हेत्रे साहेब यांचे सुचनेवरुन पोना/बेळे यांनी माझेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन घेवुन बंद करुन म्हेत्रे साहेब यांचेकडे दिले. तेव्हा म्हेत्रे साहेब यांनी आम्हा सर्वांसमक्ष मिलींद कांबळे व हनुमंत पवार यांना त्यांचे नावाबाबत विचारले असता मिलींद कांबळे यांनी त्यांचे पुर्ण नाव मिलींद सुर्यकांत कांबळे, वय 45 वर्षे पद- वरिष्ठ सहाय्यक लेखा, पंचायत समिती, धाराशिव (वर्ग-3) रा.विक्रम नगर, बोधी चौक, लातुर ता.जि.लातुर व हनुमंत पवार यांनी त्यांचे संपुर्ण नाव हनुमंत गोपाळराव पवार, वय 69 वर्षे, सेवानिवृत्त सहाय्यक कनिष्ठ अभियंता, मुळ रा. सटवाईवाडी पो.तेरखेडा ता.वाशी सध्याचा पत्ता काकडे प्लॉट, दत्त नगर, धाराशिव जि.धाराशिव असे असल्याचे सांगितले. त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी तेथे पुढील कामकाज केले व मला लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद येथे येणे बाबत सांगितले. त्यावरुन मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद येथे हजर आलो.

त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी मला त्यांचे कॅबीनमध्ये बोलावुन कॅबीनच्या खिडक्या, दरवाजा व लाईट बंद करुन केलेल्या कृत्रीम अंधारात माझ्या हातांची व पॅन्टची तपासणी केली असता माझे उजवे हाताचे बोटाचे पे-यावर व पॅन्टचे उजव्या बाजुचे खिशामध्ये आतील बाजुस ठिकठिकाणी अँथ्रासीन पावडरची चकाकी दिसुन आली. त्यानंतर म्हेत्रे साहेब यांनी माझे व दोन्ही पंचासमक्ष रेकॉर्डर मधील संभाषण ऐकले.

एकंदरीत दिनांक 26.09.2023 रोजी मी दिलेल्या तक्रारीवरुन माझे आईस शासनाकडून सेवानिवृत्तीनंतर मिळणारे अंशराशीकरण व उपदानाची एकुण रक्कम 15,29,804/- रुपये तिचे बँक खात्यावर जमा करणेसाठी मिलींद सुर्यकांत कांबळे, वरिष्ठ सहाय्यक लेखा, पंचायत समिती, धाराशिव यांनी दिनांक 26.09.2023 रोजी माझ्याकडे 4,000/- रुपये लाचेची मागणी केली व त्यांनी दिनांक 27.09.2023 रोजी माझे आईचे बँक खात्यावर तिला सेवानिवृत्तीनंतर शासनाकडून मिळणारे अंशराशीकरण व उपदानाची रक्कम 15,29,804/- रुपये जमा करुन आज दिनांक 28.09.2023 रोजी 11.55 ते 12.22 वा. चे दरम्यान मिलींद कांबळे यांनी माझ्याकडुन 4,000 /- रुपये लाच रक्कम पंचायत समिती, धाराशिव चे आवारातील हॉटेलमध्ये स्वत: स्विकारली व सदरची लाच रक्कम मिलींद कांबळे यांना देण्यासाठी हनुमंत गोपाळराव पवार, सेवानिवृत्त सहाय्यक कनिष्ठ अभियंता, मुळ रा.सटवाईवाडी पो.तेरखेडा ता.वाशी सध्याचा पत्ता काकडे प्लॉट, दत्त नगर, धाराशिव जि.धाराशिव यांनी प्रोत्साहन दिल्याने त्यांचेविरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्यासाठी मी माझी फिर्याद देत असुन सदरची फिर्याद मी वाचुन पाहिली ती बरोबर व खरी आहे.

समक्ष



Scanned with CamScanner

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

PRAVINKUMAR YUVRAJ BANGAR(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): PRAVINKUMAR YUV

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): PI

पोलीस ठाणे अमलदार
पोलीस ठाणे
आनंद नगर, उस्मानाबाद

Scanned with CamScanner